महाराष्ट्र पोलीस

**पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण**

पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक-पीन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७०० E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in


**प्रेसनोट** दिनांक :- १४/०९/२०२३

# पिंपळगावातील HDFC बॅंकेचे ATM फोडणारा आंतरराज्यीय सराईत गुन्हेगार ग्रामीण पोलीसांच्या जाळयात, सिन्नर मध्ये ATM फोडल्याचीही कबुली

पिंपळगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २६/०८/२०२३ रोजी मध्यरात्रीचे सुमारास चिंचखेड चौफुली परिसरातील अज्ञात आरोपींनी HDFC बॅंकेचे ATM चे शटर अर्धवट उघडून आत प्रवेश करून ATM मशिन गॅस कटरच्या सहाय्याने फोडून त्यातील रोख रक्कम २८,३५,४००/- रूपये लबाडीच्या इराद्याने घरफोडी चोरी करून चोरून नेले बाबत पिंपळगाव पोलीस ठाणे येथे गुरनं २०७/२०२३ कलम ४५७,३८० भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. शहाजी उमाप व अपर पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार-कांगणे यांनी सदर प्रकरणी त्वरीत घटनास्थळी भेट देवून स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास सदर गुन्हा उघडकीस आणणेसाठी मार्गदर्शन करून सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. हेमंत पाटील व पोलीस निरीक्षक श्री. सुनिल पाटील यांनी ATM चोरीचे गुन्हयातील आरोपींची गुन्हा करण्याची पध्दत व त्यांनी गुन्हा करतांना वापरलेल्या वाहनांचा तपास करण्यासाठी जिल्हयाचे सीमावर्ती भागांमध्ये तपास पथके रवाना केली होती. तसेच महाराष्ट्र राज्यातील विविध शहरांमधील ATM चोरीचे गुन्हयातील निष्पन्न आरोपींची माहीती देखील संकलीत केली. त्यावरून गुप्त बातमीदारामार्फत माहीती काढून यातील गुन्हेगार हे हरियाणा राज्यातील असल्याचे खात्रीशीररित्या समजले व त्यातील काही गुन्हेगार हे सध्या महाराष्ट्रातच असल्याची खबर मिळाली. त्यानूसार स्थागुशाचे पोलीस पथकाने नाशिक व अहमदनगर जिल्हयाचे सीमावर्ती भागात सापळा रचून ATM चोरीतील सराईत गुन्हेगार नामे **१) इरशाद खान आस मोहम्मद खान, वय ३८, रा. हातीन, जि. पलवल, राज्य हरियाणा** यास शिताफीने ताब्यात घेतले. त्यास विश्वासात घेवून सखोल चौकशी केली असता, त्याने त्याचे हरियाणा राज्यातील इतर साथीदारांसह पिंपळगाव परिसरात येवून **HDFC** बॅंकेचे **ATM** गॅस कटरच्या सहाय्याने फोडून त्यातील रोख रक्कम चोरी केल्याची कबुली दिली आहे.

यातील आरोपी इरशाद यास अधिक विचारपूस केली असता, त्याने वरील गुन्हयात एक सफेद रंगाची क्रेटा कार व एक मोठा ट्रक वापरला असल्याचे सांगितले आहे. सदर आरोपी हे हरियाणा राज्यातून वाहने भाडयाने ठरवून विविध राज्यांतील बनावट नंबर प्लेट वाहनांवर लावून, त्यातून ATM फोडण्यासाठी गॅस कटर मशिन व सिलेंडर सोबत घेवून येत असतात. तसेच महामार्गांवरील नजीकचे ATM मशिनची गुगल मॅपव्दारे माहीती काढून, रेकी करून सदर ATM मशिन गॅस कटरच्या सहाय्याने फोडून रोख रक्कम चोरी करत असल्याची माहीती तपासादरम्यान पुढे येत आहे.

वरील ताब्यात घेतलेला आरोपी **इरशाद खान आस मोहम्मद खान** हा सराईत गुन्हेगार असून त्याचेवर यापूर्वी अहमदनगर, लातुर, हिंगोली, औरंगाबाद या जिल्हयांमध्ये तसेच मध्यप्रदेश राज्यातील कसरावद, निमच या ठिकाणांवर ATM चोरी व जनावर चोरीचे गुन्हे दाखल आहेत. तसेच त्याने यापुर्वी **सिन्नर शहरातील ॲक्सिस बॅंक ATM** मध्ये देखील चोरी केल्याची कबूली दिली आहे. सदर आरोपीस पिंपळगाव पोलीस ठाणेकडील वरील गुन्हयात अटक करण्यात आली असून मा. न्यायालयाने त्याची ०७ दिवस पोलीस कोठडी रिमांड मंजूर केली आहे. सदर गुन्हयाचे तपासात वरील आरोपीकडून महाराष्ट्र राज्यातील ATM चोरीचे आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. यातील आरोपीचे साथीदार, तसेच गुन्हयात वापरलेली वाहने व मुद्देमालाचा शोध घेण्यासाठी पोलीस पथक कसोशिने तपास करीत आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. शहाजी उमाप, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार-कांगणे यांनी वरील गुन्हा उघडकीस आणणेसाठी केलेले मार्गदर्शनानूसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. हेमंत पाटील, पोलीस निरीक्षक श्री. सुनिल पाटील, सपोनि सागर कोते, सपोनि गणेश शिंदे, पोउनि नाना शिरोळे, पोहवा नवनाथ सानप, पोना विश्वनाथ काकड, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम यांचे पथकाने सदर गुन्हा उघडकीस आणण्यासाठी परिश्रम घेतले आहेत.

सदर गुन्हयातील तपास पथकाने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी दहा हजार रूपयांचे बक्षीस जाहीर करून अभिनंदन केले आहे.